नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/12/2023 (बुधवार) दुपार

---

## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. सावनेर :– फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे अप. क्र. ५४६/२० कलम ३७६, ३७६(३), ५०६ भादवि. सहकलम ४, ५(जे)(२),५(एल), ६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयातील फिर्यादी व **आरोपी नामे– राजेश गुनाजी बोरीवार, वय ३० वर्ष, रा. कुसुंबीता. सावनेर जि. नागपुर** हे एकमेकांचे घराजवळ राहत असुन नातेवाईक असल्याने आरोपीचे फिर्यादीच्या घरी येणे जाणे होते. फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हिला पोटदुखी व उलटयांचा त्रास होत असल्याने फिर्यादीने अल्पवयीन मुलगी हिला विचारपूस केली असता तिने सांगितले की माहे डिसेंबर २०१९ मध्ये एके दिवशी आरोपीने ती घरी एकटी असल्याचा गैरफायदा घेवुन तिच्यासोबत आरोपीने बळजबरीने जबरी संभोग केला. त्यानंतर ही तीन चार वेळा त्याच महिन्यात जबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यामुळे पिडीता हि तीन महिन्याची गरोदर राहिली. फिर्यादीने आरोपीचे घरी जावुन जाब विचारले असता आरोपीने कबुली दिली. त्यावर पिडीताचे आरोपीसोबत लग्न करून देवु असे ठरले व बदनामी होईल या भीतीने फिर्यादीने पोलीस ठाणे येथे रिपोर्ट दिली नाही. दिनांक ०९/०९/२०२० रोजी पिडीतेची प्रसुती होवुन मुलगा झाला परंतु आरोपी व त्याचे घरच्यांनी भांडण करून पिडीतेचे आरोपीशी लग्न लावुन देणार नाही. तुझ्याने जे होईल ते कर असे म्हणाले.

सदर प्रकरणाचे तपास सहायक पोलीस निरीक्षक रासकर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. श्रीखंडे सा. अतिरीक्त जिल्हा न्यायाधीश जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक २७/१२/२०२३ रोजी मा. श्रीखंडे सा. अतिरीक्त जिल्हा न्यायाधीश जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला सदर गुन्हयात कलम ६ पोक्सो मध्ये २० वर्ष सश्रम कारावास व १०,०००/– रू. दंड, दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास व कलम ५०६(१) भादवि. मध्ये २ वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी बालपांडे मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोहवा मधुकर आदमने पो.स्टे. सावनेर यांनी मदत केली आहे.

# जबरी संभोग करणाऱ्या आरोपीस अटक

**पोस्टे मौदा :—** यातील फिर्यादी ही १२ वी मध्ये शिक्षण घेत असुन फिर्यादीच्या भावाचा मित्र आरोपी नामे— शुभम रतन धनजोडे, वय २४ वर्ष, रा. केसोरी ता. कामठी जि. नागपूर याला फिर्यादी ही ०२ वर्षापासून ओळखते शाळेमध्ये जात असतांनी फिर्यादीच्या मागे मोटारसायकलने यायचा व तुझ्यावर प्रेम आहे व फिर्यादीला ''तुझासोबत लग्न करायचे आहे'' असे म्हणून शाळेत जात असतांनी थांबवून बोलायचा फिर्यादीने त्याला नकार दिला तेव्हापासून फिर्यादी ही आरोपीसोबत बोलत नव्हती. फिर्यादीच्या भावाने पिडीत मुलगी तसेच आरोपीला बोलतांनी दिसल्यापासून बोलणे बंद केले होते. आरोपी हा केसोरी ते वडोदा जाणाऱ्या रोड दरम्यान भेटला व आरोपीने पिडीत मुलीला गाडीवर बसवले व ग्रीनलाईट हॉटेल कुही रोड भूगाव येथे घेवून गेला आरोपीने हॉटेलमध्ये नेले व मैत्रीणीचे आधारकार्ड दाखवून सोबत जबरदस्तीने शारीरीक संबंध केले. आरोपीने पिडीत मुलीला लग्नाचे आमीश दाखवून पिडीत मुलीसोबत वारंवार बोलून पीडीत मुलीचा पाठलाग करून तिला वारंवार गाडीवर बसवून हॉटेलमध्ये घेवून गेला. लग्नाचे आमीश दाखवून व पीडीत मुलीचे ईच्छेविरूदध शारीरीक संबंध प्रस्थापित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरूद्ध कलम ३७६ (२)(जे), ३७६ (२)(एन), भादंवी सहकलम ४, ६ बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि सोनेकर पोस्टे मौदा मो. क्र. ८९७५९२१७७० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**